# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य २०२१/डीबीटी/ 10085 दि.०७.०९.२०२१

8 SEP 2021

तात्काळ ईमेलद्वारा

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- महाडीबीटी पोर्टलवर महाविद्यालयांचे खाते क्रमांक अद्ययावत करणेबाबत.**

संदर्भ :- माहिती तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय क्र. GAD-मातंस–2018/C.R.138/S.1/39, दि. १२ ऑक्टोंबर, २०१८

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये, राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे महाडीबीटी पोर्टलवरुन अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदरहू पोर्टलवर महाविद्यालयांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करणे आवश्यक आहे. ज्यामध्ये महाडीबीटी पोर्टलमध्ये महाविद्यालयांना त्यांचे खाते क्रमांक नमुद करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे.

तथापि ज्या महाविद्यालयांना त्यांचे शिष्यवृत्ती खाते क्रमांकामध्ये बदल / दुरुस्ती करण्याची आहे, अशा महाविद्यालयांनी त्यांचे महाडीबीटी पोर्टलवरील प्राचार्य लॉगीनमध्ये उपलब्ध असलेल्या Update Bank Account या पर्यायाचा वापर करुन आपले खाते क्रमांकामध्ये सुधारणा करावी. तसेच त्यासोबत खाते क्रमांक बदलाबाबतच्या कारणांच्या तपशिलासह प्राचार्य यांच्या स्वाक्षरीचे पत्र व महाविद्यालयाचे नाव नमुद असलेले खाते क्रमांचा चेक / बँक स्टेटमेंट यांची छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

महाडीबीटी पोर्टलद्वारे दिलेल्या पर्यायाच्या आधारे प्राचार्य लॉगीन मधून ऑनलाईन पध्दतीने विनंती केल्यानुसारच उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त महाविद्यालयाचे खाते क्रमांक अद्ययावत करण्यात येणार असून, या संचालनालयास स्वतंत्र पत्र / इमेल पाठविण्याची आवश्यकता नाही.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. मा. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.

प्रत :- १. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
२. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner